कि.फौ.ख.क्र.३३/१९९९
सरकार –वि– श्रीकृष्ण
<u>निशाणी क्रमांक १३</u>

<u>आरोपी फरार असल्यामुळे कलम २९९ फौ.प्र.संहितेनुसार बयाण नोंदविण्यात आले.</u>

**<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०५ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– भास्कर विक्रम गवई
वय :– ७७ वर्ष, व्यवसाय :– सेवानिवृत्त
राहणार :– खामगांव, ता.खामगांव, जि.बुलढाणा

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. मी आरोपीला ओळखतो. दिनांक २३.०१.१९९९ साली मी जलंब पोलीस स्टेशन येथे एएसआय या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी आरोपी गुन्हयामध्ये अटक करण्यात आला होता. दिनांक २३.०१.१९९९ रोजी ८.०० ते २.०० या कालावधीत स्टेशन अंमलदार म्हणुन माझी डयुटी असतांना १८.३० वाजेच्या दरम्यान प्रकाश दंडे व सुभाष ठाकरे यांची आरोपी रिमांड डयुटी असतांना आरोपी श्रीकृष्ण मांजरे हा लॉकअप मधुन त्यांचे स्वाधीन न्यायालयात हजर करणेकामी करण्यात आला. पोलीसांनी हतकडी त्याचे पायाला लावली व न्यायालयात हजर करणेकाम घेवुन आले. त्याच दिवशी परत रात्री २०.०० ते ८.०० माझी डयुटी असतांना मला माहीती मिळाली की प्रकाश दंडे याचे डोक्यात आरोपीने दगड मारला व पळुन गेला. त्यानंतर प्रकाश दंडे यांनी आरोपीविरुध्द तक्रार दिली व पीएसओ शिंदे यांनी तक्रार नोंदवुन घेतली. सदर प्रकरणात माझे बयाण नोंदविण्यात आले होते. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो.

सरतपास पुर्ण.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

MADHURI KEWAL GOTE

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – १५.०४.२०२६.**

**माझे समक्ष,**

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.04.15 12:09:37 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – १५.०४.२०२६**